पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ५

**सभावृत्तांत**

दिनांक - **२४/०७/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२४/०७/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**

२. मा.भोईर सुरेश शिवाजी

३. मा.घोलप कमल अनिल

४. मा.गायकवाड निर्मला मनोज

५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

६. मा.उषा संजोग वाघेरे-पाटील

७. मा.सुलक्षणा राजू धर

८. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी, मा.मोरे, चव्हाण – कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २४/०७/२०१८ विभाग – विद्युत

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मुका/तां.वि/३४७/२०१८, दि.१६/०७/२०१८

विषय - महाराष्ट्र राज्य शासनाचे ऊर्जा संवर्धन धोरण – २०१७ नुसार ऊर्जा संवर्धन व वाढ करणे, अंमलबजावणी करणेकरीता शासन निर्णय दि.१२/०१/२०१८ व दि.०४/०६/२०१८ अन्वये ईस्को तत्वावर स्थानिक स्वराज्य संस्थांनी पथदिव्यांकरिता फक्त एलईडी पथदिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे बंधनकारक केलेने पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेच्या रस्त्यावर पारंपारिक दिवे बदलणेच्या कामास शासनाने अधिकृत केलेले मे.ईईएसएल समवेत करारनामा करणेस व त्यांचेकडून संयुक्तीक पाहणीनंतर अंतीम अहवालानुसार काम करवून घेणेस व त्यापोटी करारनाम्यानुसार निर्धारित होणारी रक्कम अन्युटी बेसीसवर पुढील ७ वर्षांकरिता ईस्क्रो खाते उघडून त्यामधून अदा करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**सीमा दत्तात्रय चौगुले**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४६७/२०१८
दिनांक : २५/०७/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.